# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१३५/२०२२ मधील नि.क्र.४४ वरील आदेश :
(श्रीमती सुवर्णा सरगडे वि. डॉ दिपक बनसोडे व इतर)

१) अर्ज, म्हणणे, सोबतची प्रतिज्ञापत्रे, लेखी युक्तिवाद व अभिलेख पाहीले.

२) अर्जदार हिने मुळ अर्ज सामनेवाला यांचे पालकत्व रद्द होवून मिळणेसाठी तसेच तिची नात कु.माही हिचा ताबा मिळणेसाठी केलेला आहे. तिच्या कथनाप्रमाणे कि.दि.अर्ज क्र.०१/२०२० मध्ये नि.३० वरील तडजोड पुरशिसप्रमाणे सुट्टीच्या काळात सुट्टी घालविणेचे अधिकार मे. कोर्टाच्या आदेशान्वये दिलेले आहेत. कु. माही ही सध्या दुसरीमध्ये शिकत असून सामनेवालांचे ताब्यात आहे. सदर आदेशाप्रमाणे, अर्जदार ही ताबा घेणेस गेली असता सामनेवाला यांनी नकार दिला व घराला कुलूप लावून निघून गेले. तसेच संपर्क केल्यावर फोनही घेतला नाही म्हणून तिची उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत म्हणजेच दि.२७.०३.२०२४ ते १५.०६.२०२४ च्या दरम्यान एक महिना कु.माहीचा तात्पुरता ताबा अर्जदार हिला मिळावा अशी तिने विनंती केलेली आहे.

३) सामनेवाला यांनी त्या अर्जास उत्तर देताना नि.४४ द्वारे असे सांगितले आहे की, कु.माही ही गणित विषयात अतिशय हुशार असून तिला ॲबॅकसचे क्लासेस दि. १७.०३.२०२४ पासून सुरु असून सदरचे क्लासेस हे जुनपर्यंत चालणार आहेत. तसेच १ मे ते १५ मे पर्यंत समर कॅंप ड्रॉईंग क्लास कोरेगाव येथे आहे. अशा परिस्थितीत तिचे शैक्षणिक नुकसान करुन तिला अर्जदारसोबत पाठविता येत नाही.

४) पुढे त्यांचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला यांनी कु. माहीस भेटणेसाठी कधीही मज्जाव केलेला नाही. मात्र त्यांची कु.माहीला अर्जदारसोबत पुणे येथे पाठविणेस सक्त हरकत आहे कारण तिचे आईवडील दोघेही मृत असून अर्जदार तिला कच-याच्या गाडीवर घेवून जाते. त्यामुळे तिच्या पालणपोषणाचा व संरक्षणाचा

प्रश्न निर्माण होणार आहे. तसा अहवाल चाईल्डलाईन या सरकारी रजिस्टर संस्थेनेदेखील दिलेला आहे. या सर्व बाबींचा विचार करुन अर्ज रद्द करावा.

५) याबाबत दोन्ही पक्षकारात वाद नाही की, कि.दि.अर्ज क्र.०१/२०२० मध्ये नि.३० अन्वये तडजोड होवून तो अर्ज निकाली काढणेत आला. त्यानुसार कु. माहीचा ताबा सामनेवाला यांना देणेत आला. त्यांना कु. माहीची जबाबदारी, उत्कर्ष व काळजी घेणेबाबत सर्व निर्देश देणेत आले. त्या कामातील नि.क्र.३० ची तडजोड पुरशिसची प्रत या कामात दाखल केलेली आहे. त्या तडजोड पुरशिसमध्ये असा उल्लेख आहे की, सुट्टीच्या काळात अर्जदार हिला कु. माहीसोबत सुट्टी घालविणेचे अधिकार आहेत. त्यानुसार अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज केलेला असला तरी अर्जदार हिची मागणी अत्यंत मोघम स्वरुपाची असून कि.दि.अर्ज क्र.०१/२०२० मधील आदेशानुसार, कु.माही हिच्या हिताची व भविष्याची जबाबदारी सामनेवाला यांचेवर असलेने तसेच या कालावधीत कु. माहीचे इतर शैक्षणिक वर्ग असलेने तिचे नुकसान करता येणार नाही. याशिवाय चाईल्डलाईन या सरकारी रजिस्टर संस्थेच्या अहवालानुसार, "अर्जदार ही कु. माही हिला कच-याच्या गाडीवर घेवून जाते त्यामुळे कु.माहीच्या पालणपोषणाचा व संरक्षणाचा प्रश्न निर्माण होत आहे असे मत नोंदविले आहे." सामनेवाला यांनी तिच्या उन्हाळी सुट्टीच्या क्लासेसबाबत व चाईल्डलाईन संस्थेची प्रत दाखल केलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता तसेच कु. माहीचे वय लक्षात घेवून अर्ज नि.क्र.४४ रद्द केला. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KAMALA VIJAYKUMAR BORA
Date: 2024.05.10 16:07:43 +0530

**दि. ०९.०५.२०२४.** **कमला वि. बोरा**

**ठिकाण : सातारा** **जिल्हा न्यायाधीश-१ सातारा.**